प्रति,                                                                                    दिनांक :    .   .२०२०

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

**विषय : प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा होणारा अवमान रोखणे आणि शासनाने बंदी घातलेले प्लास्टिकचे ध्वज विक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणेविषयी....**

महोदय,

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता ! मात्र याचे विस्मरण होऊन केवळ १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशीच मोठ्या अभिमानाने मिरवले जातात. हेच कागदी/प्लास्टिकचे राष्ट्रध्वज त्या दिवसापासूनच रस्त्यावर अन् गटारात फाटलेल्या अवस्थेत आढळतात. प्लास्टिकचे ध्वज लगेच नष्टही होत नाहीत, त्यामुळे अनेक दिवस या राष्ट्रध्वजांची विटंबना पाहावी लागते. राष्ट्रध्वजाची ही विटंबना रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका (१०३/२०११) दाखल केली होती. याविषयी सुनावणी करतांना न्यायालयाने प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाद्वारे होणारा अवमान रोखण्यासाठी शासनाला आदेश दिले आणि त्यानुसार केंद्रीय अन् राज्य गृह विभाग, तसेच शिक्षण विभाग यांनी याविषयीचे परिपत्रकही काढले आहे. याचसमवेत महाराष्ट्र शासनाने राज्यात 'प्लास्टिक बंदी'चा निर्णय घेतला आहे. त्यानुसारही प्लास्टिकचे राष्ट्रध्वजांची विक्री करणे हेदेखील कायदाबाह्य ठरते.

राष्ट्रीय प्रतिकांचा अवमान रोखण्यासाठी समिती प्रतीवर्षी 'राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !' हा उपक्रम राबवते. स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणाच्या वेळी 'झंडा उँचा रहे हमारा', असे अभिमानाने गातो; पण त्यानंतर काही काळातच लहान मुलांना खेळण्यासाठी, वाहनांवर लावण्यासाठी घेतलेले कागदी आणि प्लास्टिकचे झेंडे रस्त्यावर अन् नंतर कचराकुंडीत पाहायला मिळतात, तसेच ते पायदळी तुडवले जातात. काही जण तिरंग्याच्या रंगाप्रमाणे चेहरा रंगवतात. यामुळे स्वातंत्र्यदिनीच राष्ट्रध्वजाचा घोर अवमान होत आहे. ज्या क्रांतिकारकांनी या ध्वजाच्या प्रतिष्ठेसाठी प्रसंगी प्राणाचेही बलीदान दिले, त्यांच्या बलीदानाची ही क्रूर चेष्टाच नव्हे का ?

तरी अनुमती नसतांना जे विक्रेते शासनाचा अध्यादेश डावलून प्लास्टिकचे ध्वज विक्री करतात, तसेच जे लोक, संस्था, समूह, तसेच अन्य कोणीही ध्वजसंहितेनुसार ध्वजाचा मान राखत नाहीत, त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

स